नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

| वर्ष - ४ रे<br>Year - 4rd | अंक - २०<br>Issue - 20 | वार - रविवार दि. १४ जून २०२६<br>Blow- Sunday Date 14 JUNE 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com<br>वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४<br>Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये<br>Amout - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026<br>ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com |
|---|---|---|---|---|---|---|

# आसाममध्ये लष्करी विमान कोसळून ५ जवानांचा मृत्यू

## आसामच्या जोरहाच हवाई तळाच्या परिसरातच घडली दुर्घटना; एक को-पायलट गंभीर जखमी, उपचार सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : शनिवारी, सकाळी १० वाजताच्या सुमारास आसामच्या जोरहाटमधील भारतीय हवाई तळाजवळ, एक लष्करी विमान कोसळून मोठी दुर्घटना झाल्याची बातमी समोर आली होती. याबाबत आता एक हृदयद्रावक अपडेट समोर आली आहे. या भीषण अपघातात ५ जवानांना वीर गती आली असून, एक को-पायलट गंभीर जखमी झाला आहे.

दरम्यान, अँटोनोव्ह एएन-३२ हे दोन इंजिन असणारे टर्बोप्रॉप मिलिटरी ट्रान्सस्पोर्ट विमान, जोरहाच हवाई तळाच्या आजूबाजूच्या परिसरात कोसळले. या भीषण अपघातावेळी विमानात एकूण किती जवान स्वार होते, याचा अधिकृत आकडा अद्याप समोर आलेला नाही. मात्र यामध्ये ५ जवानांना त्यांचे प्राण गमवावे लागले.

स्क्वाड्रन लीडर प्रशांत सिंह, फ्लाईट लेफ्टनंट शुभम कुमार, सार्जंट जितेंद्र शर्मा, अग्निवीरवायू खेमाराम कुमावत, अग्निवीरवायू दानिश आलम या वीरांचा समावेश होता. तसेच जखमी झालेल्या को-पायलटचे नाव अद्याप समोर आलेले नाही. मात्र, इंडियन एअर फोर्सने पूर्ण यादी जाहीर केल्यावरच पुढील माहिती समोर येईल, असे स्पष्ट केले आहे. सैन्य पुरवठा आणि इतर साहित्य वाहून नेण्यासाठी निघाले असतानाच हा अपघात झाला. विमान लँडिंग करताना क्रॅश झाले आणि अवघ्या काही सेकंदातच विमानाने पेट घेतला. यावेळी हवेत आगीचे आणि धुराचे मोठेच्या मोठे लोट उडत होते. घटनेची माहिती मिळताच अपात्कालीन मदत पथके आणि अग्निशामक दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी पोहोचल्या. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी आणि आगीवर नियंत्रण मिळवण्यासाठी युद्धपातळीवर प्रयत्न सुरू होते. घटनेनंतर स्थानिक प्रशासन आणि पोलिसांनी तातडीने हवाई दल स्थानकाबाहेर कडेकोट सुरक्षा व्यवस्था तैनात केली असून, जखमींच्या मदतीसाठी जोरहाटमधील स्थानिक रुणालयांनाही हाय अलर्टवर राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.



दरम्यान, या अपघातात शहीद झालेल्या जवानांमध्ये दोन अग्निवीरांचाही समावेश होता, जे १८ ते २३ या वयोगटातील असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर इतर अधिकारी हे सामान्यतः २८ ते ३५ वर्षे वयोगटातील असल्याचे सांगितले जात आहे. या घटनेमुळे वीरगती प्राप्त झालेल्या जवानांच्या कुटुंबांवर दुःखाचे डोंगर कोसळले आहे. ही हृदयपिळवटणारी घटना घडल्यानंतर भारतीय हवाई दलाकडून या घटनेच्या चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. सोव्हिएत युनियनने भारताच्या विशिष्ट गरजा आणि भौगोलिक परिस्थिती लक्षात घेता, अगदी कोणत्याही वातावरणात टिकून राहणारे आणि संकटांवर मात करणारे हे विमान तयार केले होते. वायुसेनेचे वर्कहॉर्स म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या विमानाच्या अपघातामुळे जोरहाटमध्ये एकच खळबळ उडाली आहे. दरम्यान, २०२६ या वर्षातील आसाममधील ही दुसरी सर्वात मोठी दुर्घटना असून, अशीच एक घटना मार्च महिन्यात घडली होती. यापूर्वी ५ मार्च रोजी आसामच्या कार्बी आंगलॉन्ग जिल्ह्यात वायुसेनेचे सुखोई विमान कोसळले होते, ज्यामध्ये वायुसेनेच्या दोन वैमानिकांचा दुर्दैवी मृत्यू झाला होता. या विमानाने जोरहाट एअरफोर्स स्टेशनवरून नियमित सरावासाठी उड्डाण केले होते. या घटनेनंतर भारतीयांकडून खंत व्यक्त केली जात असून, प्रशासनाला जाब विचारला जात आहे. यानंतर अग्निवीर कुटुंबाला कोणते फायदे मिळतील?, यासाठी जबाबदार कोण? एका घटनेची जबाबदारी निश्चित होण्यापूर्वीच अशा आणखी किती घटना घडतील? असे गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत.



# 'अल निनो'मुळे दुष्काळाचा धोका ? पाणी जपून वापरण्याचे हवामान खात्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : भारतीय हवामान विभागाने व्यक्त केलेल्या अंदाजानुसार यावर्षी एल निनो परिस्थितीचा प्रभाव राहण्याची शक्यता असून, पर्जन्यमानात घट होण्याची शक्यताही वर्तविली आहे. यासर्व पार्श्वभूमीवर राज्यातील विविध धरणं, जलाशय आणि जलस्त्रोतांमध्ये उपलब्ध असलेला पाणीसाठा संरक्षित करुन, सुरु असलेली पाण्याची आवर्तन तात्काळ बंद करण्याचे निर्देश जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डौले यांनी सर्व विभागीय आयुक्त आणि जिल्हाधिका-यांना दिले आहेत. या संदर्भात शासनाने काढलेल्या परिपत्रकात सर्व जिल्हाधिकारी व संबधित जलसंपदा विभागाच्या आधिका-यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील धरणं व जलाशयांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा तातडीने आढावा घ्यावा. अत्यावश्यक परिस्थिती वगळता पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या पाण्याचा वापर इतर कोणत्याही कारणांसाठी करु नये. दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत सर्व शहरी व ग्रामीण भागात अखंडीत पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होईल यासाठी धरणांमध्ये आरक्षित करण्यात आलेला पाणीसाठा जपून वापरण्याबाबतही जिल्हास्तरावर कृती आराखडा तयार करण्याच्या सुचना प्रधान सचिवांनी दिल्या आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था, पाणी पुरवठा विभाग यांच्यात प्रभावी समन्वय ठेवून परिस्थितीचा नियमित आढावा घेण्याबाबत तसेच धरणं, कालवे, नद्या, तलाव व इतर जलस्त्रोतांमधून होणारा अनाधिकृत व बेकायदेशिर पाणी उपसा तात्काळ थांबविण्यासाठी विशेष मोहीम राबविण्याचे निर्देशही शासनाने काढलेल्या परिपत्रात देण्यात आले आहेत. यासाठी महसूल, पोलिस व जलसंपदा विभागाच्या आधिका-यांच्या संयुक्त पथकांमार्फत अनधिकृत मोटारी, पाईपलाईन, पंप व इतर सामुग्रींची तपासणी करण्याकरीता गस्त आयोजित करावी व वेळप्रसंगी दिनांक १२ डिसेंबर २०१८ रोजी काढण्यात आलेल्या शासन निर्णयाप्रमाणे कारवाईच्या कडक सुचनाही शासनाने परिपत्राकत दिल्या आहेत.




## तेल निर्यातीपेक्षाही मोठा फायदा होणार

# होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांवर इराण संक्रमण शुल्क आकारणार?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : १०० दिवसांहून अधिक काळ सुरू असलेले इराण-अमेरिका युद्ध आता शांततेच्या दिशेने वाटचाल करत असल्याचे दिसत आहे. इराणच्या एका वृत्तसंस्थेनुसार, अमेरिका आणि इराण जवळपास युद्धविरामावर पोहोचले आहे. दोन्ही देशांनी युद्ध तात्काळ आणि कायमस्वरूपी संपवण्यास सहमती दर्शवली आहे. या सगळ्यात, होर्मुझची सामुद्रधुनी पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आली आहे. पर्शियन आखाताला खुल्या महासागराशी जोडणारा हा अरुंद सागरी मार्ग जगाच्या ऊर्जा पुरवठ्याचा कणा मानला जातो.




जागतिक सागरी तेल व्यापारापैकी अंदाजे २० टक्के व्यापार या मार्गातून होतो. याव्यतिरिक्त, मोठ्या प्रमाणात एलएनजी देखील विविध देशांमध्ये याच मार्गाने जातो. अलीकडील घडामोडींमुळे असे वृत्त समोर आले आहे की, इराण होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांवर संक्रमण शुल्क आकारण्याचा विचार करत आहे. असे झाल्यास, इराणसाठी तेल निर्यातीपेक्षाही उत्पन्नाचा हा एक मोठा स्रोत बनू शकतो.

होर्मुझची सामुद्रधुनी आता केवळ एक सागरी मार्ग राहिलेली नाही, तर ती जागतिक राजकारण आणि ऊर्जा सुरक्षेचे केंद्र बनली आहे. इराणची संभाव्य टोल किंवा सेवा शुल्क योजना महसुलाचा एक नवीन स्रोत बनू शकते, परंतु तिला महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय कायदेशीर आणि राजनैतिक आव्हानांचा सामना करावा लागत आहे.

**प्रति बॅरल १ डॉलर शुल्क आकारण्याची चर्चा**

वृत्तानुसार, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या तेल टँकर्सवर प्रति बॅरल १ डॉलर शुल्क लावण्याच्या योजनेवर इराण विचार करत आहे.

ही प्रणाली पूर्णपणे कार्यान्वित झाल्यास इराणला दरवर्षी ७० ते ८० अब्ज डॉलर्सचे उत्पन्न मिळू शकेल, असा तज्ज्ञांचा अंदाज आहे. हा आकडा महत्त्वाचा आहे कारण इराणची तेल निर्यातीतून मिळणारी कमाई यापेक्षा खूपच कमी राहिली आहे. उपलब्ध आकडेवारीनुसार, इराणने २०२३ मध्ये तेल निर्यातीतून अंदाजे ४१.१ अब्ज डॉलर्स आणि २०२४ मध्ये ४६.७ अब्ज डॉलर्स कमावले. त्यामुळे, संभाव्य संक्रमण शुल्क महसूल तेल निर्यातीच्या कमाईला मागे टाकू शकतो.

गेल्या काही वर्षांपासून, आंतरराष्ट्रीय निर्बंध आणि प्रादेशिक तणाव असूनही इराणने आपली तेल निर्यात कायम ठेवली आहे. ताज्या अहवालानुसार, इराणचा दैनंदिन तेल महसूल फेब्रुवारीमधील ११५ दशलक्ष डॉलर्सवरून वाढून मार्च २०२६ मध्ये अंदाजे १३९ दशलक्ष डॉलर्सवर पोहोचला आहे. विशेष म्हणजे, संघर्ष असूनही, इराणची कच्च्या तेलाची निर्यात दररोज अंदाजे १.६ दशलक्ष बॅरलवर कायम राहिली आहे. शिवाय, आंतरराष्ट्रीय बाजारात इराणी तेलावरील सूट देखील कमी झाली आहे, ज्यामुळे त्याला चांगला भाव मिळत आहे.

जगातील सुमारे एक-पंचमांश तेल आणि एलएनजी याच मार्गातून

फेब्रुवारीच्या अखेरीस अमेरिका आणि इस्रायलने केलेल्या लष्करी हल्ल्यांना प्रत्युत्तर म्हणून इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतील जलवाहतुकीवर निर्बंध घातल्यावर तणाव वाढला.

या निर्णयामुळे जागतिक ऊर्जा बाजाराला मोठा धक्का बसला, कारण जगातील सुमारे एक-पंचमांश तेल आणि एलएनजी याच मार्गातून जाते. होर्मुझच्या सामुद्रधुनीतील अडथळ्यामुळे तेलाच्या किमती वाढल्या आणि जागतिक बाजारात अनिश्चितता वाढली. दोन्ही बाजूंना हजारो जहाजे अडकून पडली, ज्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापारात व्यत्यय आला.

# वास्तवातून दिशाहीन झालेल्या समाजाचे प्रतिबिंब काय ?

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

१९६० पासून राहीले तर काहीअंशी काळ हा बरा चालतांना साहित्यिक लोकांकडून वास्तव दर्शन घडले. मग या आंबेडकरवादी समाजाचे काही काळानी चार भाग झाले. या भांगाचे तर मोजमाप करता येईना एवढे भागात रूपांतर झाले. की, सर्व आजच्या लोकांना कायदा विकत घेतल्यागत दिसते. तथागतांचा बौध्द धम्म व डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा भारतीय संविधान याचा कोठेही चांगल्याप्रकारे उपयोग होताना दिसत नाही. संविधानावर सर्व जग चालते तरीपण थोतांडी लोक-मनुवादी लोक विविध ग्रंथाच्या गवगवा करतात. बुध्द आणि त्यांचा धम्म याचा जर विचार केला तर आंबेडकरवादी समाज ईतर लोकांच्या पध्दतीने राजकारण करून स्वतःचा समाज विकण्याचे काम करीत आहे. अहो, आंबेडकरवादी समाजाचे लोक विहार सोडून बाकी सर्व मंदिरात नानाविध सोंग करतांना सर्व माध्यमातून दिसत आहे. या सर्व प्रकारामुळे आम्ही दलीत, बौध्द, महार लोकांवर अन्याय होण्याचे कारणे असल्याचे समजते. म्हणून आम्हावरच अन्याय का असा प्रश्न उभा होतो.

इतर लोकांचे शिकून आमचे लोक बौध्दीक कार्यक्रमावेळी म्हणजे १४ एप्रिल, ६ डिसेंबर, बुध्द पौर्णिमा, धम्मचक्र अनुवर्तन विजयादशमी अशावेळी तरूण पोरांना व्यसनाधीन करून डीजे वाजवून समाजाला बिघडवले जाते. आमच्या लोकांवरचे झालेले अन्याय कधीच सांगत नाही. उलटपक्षी आमच्या समाजाचे शोषण होवू देतात. याला कारण असे भरकटवणारे लोक आहेत.

कधी वंदना नाही, कधी कार्यक्रमाला हजेरी नाही. याचे सदर ताजे उदाहरण वाटते. आंबेडकरांच्या कार्याचा महापुरुषांच्या पुण्याईचा काही तरी लाभ व्हावा म्हणून उपयोग नाही तर हा समाज भरकटलेला राहणार का ? याचे प्रतिबिंब काय देणार ? येणाऱ्या आमच्या पिढीला... ?

काळोखाचा अंधार पसरला होता. सूर्या असून सुद्या सर्व समाजातील नागरिक है किड्या-मुंग्याप्रमाणे जगतांना आम्ही पुस्तकात पाहीले. असाच एक दिव्य प्रकाशमय करणारा प्रज्ञावंत सूर्य डॉ. आंबेडकर जमिनीवर आला. कशाची मुभा नसतांना शिक्षण घेतले. शिक्षणात अग्रक्रम राहीले. स्वतःच्या परिवाराची कुठलीच चिंता नाही. पैशाचा मोह जळलाच नाही. जस म्हणावं की वाहां फक्त एकटाच... असे प्रगाड्य व्यक्तीमत्व, शंभर दिवस जगण्यापेक्षा शेरा सारखे एक दिवस जगा, असा सांगणारा जगाचा पितामह असून सुद्या हा आमचा समाज भरकटलेला आहे. बापांचा-बाप, जगाची सावली रमाई माऊली। हे तर सोडून केव्हाचेच गेले. मग या विस्कटलेल्या समाजाला कोण बरे सावरणार?



हुकूमशाहीचा देश होता तसाच होणार का? लोकशाहीचा देश, मग भारताच्या घटनेची लोकशाही महत्वशील राहणार का ? असा सर्वकडे ग्रामीण शहरी दिसतो आहे. काही मागात तर समाजाकडून पुतळे, विहार, सामाजिक जागा या ठिकाणी तर गंधगी तर कुठे खर्रापानांचा व्यसनी परिसर नजरेला येतो. अशा अनेक आमच्या समाजामध्ये समस्या आहे म्हणून हा भरकटलेला समाज आहे. याचे प्रतिबिंब काहीच राहणार नाही. याकडे जातीने लक्ष घालावे असे समाजातील लोकांना हे एक कार्य आहे.

**– प्रा. मुन्नाभाई नंदागवळी, गोंदिया**
**मो. ९७६४६७६४९९**

# निफाड तालुक्यातील विद्यार्थ्यांची गोल्फमध्ये चमकदार कामगिरी; रिव्हरसाईड गोल्फ कोर्सच्या खेळाडूंचा राष्ट्रीय स्पर्धेत दबदबा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड प्रतिनिधी -निफाड तालुक्यातील कुंदेवाडी येथील स्वामी विवेकानंद विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी रिव्हरसाईड गोल्फ कोर्स, निफाडचे प्रतिनिधित्व करत खत्रघ्ण ज्युनियर अँड अमॅच्युअर फीडर टूर २०२६ स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले असून. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरावरील गोल्फ स्पर्धेत आपली गुणवत्ता सिद्ध करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

कॅटेगरी 'बी' मुलांच्या गटात स्वामी विवेकानंद विद्यालयाचा विद्यार्थी अजय चव्हाण विजेता ठरला. त्याच गटात अश्विन पवार आणि ईशांत सोनवणे यांनी अनुक्रमे उपविजेतेपदे पटकावत रिव्हरसाईड गोल्फ कोर्ससाठी सर्व प्रमुख पारितोषिकांवर नाव कोरले.

तसेच रिव्हरसाईड गोल्फ कोर्सचे प्रशिक्षक राजू अहिरवार यांनी मिड-अमॅच्युअर (३५ वर्षांवरील) गटात प्रथम क्रमांक पटकावत आपल्या अनुभवाची आणि कौशल्याची छाप उमटवली. याशिवाय, रिव्हरसाईड गोल्फ कोर्सच्या संघाला स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट ड्रेस कोड पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना आधुनिक गोल्फ प्रशिक्षण उपलब्ध करून देण्याच्या रिव्हरसाईड गोल्फ कोर्सच्या प्रयत्नांना या यशामुळे मोठी दाद मिळाली असून, नाशिक येथील निफाडच्या मातीतील खेळाडू भविष्यात राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर नक्कीच झळकतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# रोहित पवारांच्या 'अन्नत्याग आंदोलना'ला शिवसेना UBT चा जाहीर पाठिंबा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर, प्रतिनिधी- महाराष्ट्रातील शेतकऱ्यांच्या कर्जमाफीच्या प्रश्नावर राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनी छत्रपती शिवाजी महाराज चौकात सुरू केलेल्या 'अन्नदात्यासाठी अन्नत्याग आंदोलना'ला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाने जाहीर पाठिंबा जाहीर केला पंढरपूर विभागाचे जिल्हा प्रमुख संभाजीराजे शिंदे यांनी पवार यांना पाठिंब्याचे पत्र दिले.

शिवसेना णइढ पक्ष, पंढरपूर विभाग, तालुका व शहर यांच्यावतीने मा. आमदार रोहित पवार यांना लिहिलेल्या पत्रात शेतकरी हिताच्या लढ्याला पाठिंबा व्यक्त करण्यात आला आहे.

आंदोलनाची मागणी काय?

रोहित पवार यांच्या आंदोलनाच्या केंद्रस्थानी दोन प्रमुख मागण्या आहेत:

१. राज्यातील सर्व शेतकऱ्यांना अटीशिवाय 'सरसकट कर्जमाफी' देण्यात यावी.

२. शासनाने पूर्वी जाहीर केलेल्या कर्जमाफी योजनेतील शेतकऱ्यांसाठी असलेल्या 'जाचक अटी' तात्काळ रद्द करण्यात याव्यात.

पत्रात म्हटले आहे की, राज्यातील शेतकऱ्यांच्या हितासाठी व त्यांच्या हक्कांसाठी आपण उभारलेला हा लढा अत्यंत महत्त्वपूर्ण असून, या अन्नत्याग आंदोलनास आम्ही जाहीर व संपूर्ण पाठिंबा व्यक्त करीत आहोत.



शासनाने शेतकरी हिताच्या या मागण्यांचा तातडीने सकारात्मक विचार करून शेतकऱ्यांना न्याय द्यावा, अशी प्रामाणिक अपेक्षा शिवसेना णइढ, पंढरपूरकडून व्यक्त करण्यात आली आहे.

# वनगळी येथे महिलेसह कुटुंबीयांवर हल्ला; मंगळसूत्र हिसकावल्याची तक्रार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर : तालुक्यातील वनगळी येथे पोलीस पंचनामा सुरु असताना वाद घालून एकाने महिलेसह तिच्या कुटुंबीयांवर हल्ला करुन महिलेच्या गळ्यातील अर्धा तोळ्याचे सोन्याचे मंगळसूत्र हिसकावून नेल्याची घटना गुरुवारी ( दि.११) सायंकाळी घडली. महिलेने दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपीवर इंदापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सोमनाथ नामदेव चव्हाण (रा.वनगळी, ता.इंदापूर) असे आरोपीचे नाव आहे. अर्चना अतुल सोनकांबळे (वय ३६ वर्षे, रा.वनगळी) असे तक्रारदार महिलेचे नाव आहे.

सांगितले की,अर्चना सोनकांबळे, त्यांचे पती अतुल सोनकांबळे व मुलगा आर्यन हे घरी असताना बावधन पोलीस ठाण्याच्या महिला सहाय्यक पोलीस निरीक्षक शितल गिरी व पोलीस कर्मचारी पंचनामा करण्यासाठी त्यांच्या घरी आले होते. त्यावेळी गावातील सोमनाथ नामदेव चव्हाण हा तेथे आला. त्याला निघून जाण्यास सांगितल्याने त्याने शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. वाद वाढल्यानंतर सोमनाथ चव्हाण याने अर्चना सोनकांबळे यांना थप्पड मारून दगडाने खांदा व पाठीवर मारहाण केली. तिला सोडवण्यासाठी आलेल्या मुलगा आर्यन याला लाथाबुक्क्यांनी तर पती अतुल सोनकांबळे यांना दगडाने मारून दुखापत केली व माझा भाऊ किरण बाळु चव्हाण हा जेल मधून सुटुन आल्यानंतर तुम्हाला बघुन घेऊ अशी धमकी दिली असे तक्रारीत नमूद आहे. मारहाणीदरम्यान अर्चना सोनकांबळे यांच्या गळ्यातील अर्धा तोळ्याचे सोन्याचे मणीमंगळसूत्र हिसकावून घेतल्याचा आरोप फिर्यादीमध्ये करण्यात आला आहे. घटनेनंतर डायल ११२ वर संपर्क साधून पोलीस मदत मागवण्यात आली. जखमींवर उपजिल्हा रुग्णालय, इंदापूर येथे उपचार करण्यात आले आहेत. इंदापूर पोलीस पुढील तपास करीत आहेत.

# शिराढोण पोलिसांची कारवाई: रॉयल लॉजवर छापा, वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश; एकाला अटक, मालक फरार



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब प्रतिनिधी - शिराढोण (ता कळंब) पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे नायगाव-मुरुड रोडवरील रॉयल लॉजवर छापा टाकून अवैध वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश केला. या कारवाईत दोन पीडित महिलांची सुटका करण्यात आली असून लॉज मॅनेजरला अटक केली आहे, तर लॉज मालक फरार झाला आहे.

ही घटना दि.११जून २०२६ रोजी घडली. पोलिस स्टेशन शिराढोणच्या हद्दीतील नायगाव मुरुड रोडवरील रॉयल लॉजवर पैशाचं आमिष दाखवून महिलांकडून वेश्या व्यवसाय करून घेतला जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती.

पोलिस सुत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, सहाय्यक पोलिस निरीक्षक डी.बी.कोळेकर यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी दोन पंच, महिला पंच आणि डमी पंटरच्या मदतीने छापा टाकला. छाप्यात लॉजवर सांगली जिल्ह्यातील दोन पीडित महिला आढळून आल्या. तसेच लॉज मॅनेजर अजय अच्युत रसाळ, रा. दत्तनगर, मुरुड, ता.जि.लातूर याला ताब्यात घेण्यात आलं. लॉज मालक अक्षय दादासाहेब घोगरे, रा. दत्तनगर, मुरुड हा घटनास्थळावरून पळून गेला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी अक्षय घोगरे आणि अजय रसाळ यांनी आर्थिक फायद्यासाठी पीडित महिलांना पैशाचं आमिष दाखवून नायगाव तालुका कळंब शिवारातील रॉयल लॉजवर बोलावून घेतलं होतं. त्यांच्याकडून जबरदस्तीने वेश्या व्यवसाय करून घेतला जात होता.

या प्रकरणी शिराढोण पोलिस स्टेशनमध्ये गुन्हा नोंद क्रमांक १४१/२०२६ दाखल करण्यात आला आहे. आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १४३, १४४(२), ३(५) सह अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम १९५६ चे कलम ३,४,५,६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही पीडित महिलांना महिला सुधारगृह लातूर येथे सुरक्षित ठिकाणी हलवण्यात आलं आहे. अटक करण्यात आलेल्या मॅनेजर अजय रसाळला न्यायालयात हजर केलं जाणार आहे. पुढील तपास अनैतिक व्यापार प्रतिबंध कक्ष धाराशिवचे पोलिस निरीक्षक श्री शेळके करीत आहेत.

ही कारवाई पोलिस अधीक्षक खोखर मॅडम आणि अपर पोलिस अधीक्षक पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलिस अधिकारी कळंब संजय पवार, शिराढोण पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक डी.बी.कोळेकर आणि त्यांच्या पथकाने पार पाडली.

# ॲडव्होकसी बैठकीतून उमटला निर्धार; ऊसतोड महिला कामगारांच्या कल्याणासाठी 'दृढ संकल्प'

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी : ऊसतोड महिला कामगारांचे केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बीड जिल्ह्यातील माजलगाव येथे कार्यरत असलेल्या ऊसतोड महिला कामगारांच्या आरोग्य व कल्याणासाठी विविध यंत्रणांमध्ये समन्वय निर्माण करण्याच्या उद्देशाने एकदिवसीय ॲडव्होकसी बैठकीचे आयोजन करण्यात आले. फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा संचलित आणि बोनसुक्रो अनुदानित 'ग्रो प्रकल्पा'अंतर्गत आयोजित या बैठकीत शासकीय व खाजगी वैद्यकीय अधिकारी, सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी तसेच एन.एस.एल. साखर कारखान्याचे प्रशासकीय अधिकारी सहभागी झाले होते.




यावेळी उपस्थितांनी ऊसतोड महिला कामगारांना अद्ययावत आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण सुविधा आणि विविध शासकीय योजनांचा लाभ खऱ्या गरजूंना मिळवून देण्यासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचा दृढ संकल्प व्यक्त केला

एन.एस.एल. साखर कारखान्याचे व्यवस्थापकीय संचालक के. व्ही. व्ही. एस.एन. मूर्ती यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून बैठकीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेचे मार्गदर्शक प्रा. डॉ. श्रीकांत येळेगावकर, चेअरपर्सन प्रा. डॉ. एन. बी. तेली, मानव संसाधन विभागाचे वरिष्ठ अधिकारी देवाप्पा जोगरे, जी.एम. केनचे डव्होकसी विभाग प्रमुख पारसनाथ जयस्वाल, सुप्रसिद्ध स्त्रीरोग व प्रसूतीतज्ज्ञ डॉ. सावित्री घाटोळ, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड, फिल्ड को-ऑर्डिनेटर शहाबुद्दीन शेख आणि कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी उपस्थित होते.

'ग्रो प्रकल्पा'ची माहिती देताना डॉ. येळेगावकर म्हणाले की, एन.एस.एल. साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रातील ऊसतोड महिला कामगारांसाठी प्रजनन आरोग्य, कुटुंब कल्याण सेवा, गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियांची कारणमीमांसा व प्रतिबंधात्मक उपाय, मासिक पाळी स्वच्छता आणि सॅनिटरी नॅपकिनच्या वापराविषयी जनजागृती केली जात आहे. तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ पात्र महिलांपर्यंत पोहोचविण्यासाठी प्रकल्प प्रभावीपणे कार्यरत असल्याचे त्यांनी सांगितले.

उद्घाटनपर भाषणात के. व्ही. व्ही. एस.एन. मूर्ती यांनी 'ग्रो प्रकल्पा'च्या कार्याचे कौतुक करताना सांगितले की, ऊसतोड महिला कामगारांपर्यंत प्रजनन आरोग्यविषयक सेवा घरपोच पोहोचविणे, अनावश्यक गर्भाशय काढण्याच्या शस्त्रक्रियांपासून त्यांना परावृत्त करणे आणि प्रभावी समुपदेशन करणे हे अत्यंत महत्त्वाचे कार्य प्रकल्पामार्फत होत आहे. या उपक्रमाच्या भविष्यातील वाटचालीसाठी एन.एस.एल. साखर कारखान्याकडून सर्वतोपरी सहकार्य केले जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

बैठकीदरम्यान उपस्थित वैद्यकीय अधिकाऱ्यांनीही मनोगत व्यक्त केले.

माजलगाव तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे आणि खाजगी रुग्णालयांमार्फत ऊसतोड महिला कामगारांना दर्जेदार व मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्यासाठी तसेच त्यांच्यापर्यंत विविध कल्याणकारी योजना पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. या बैठकीस २५ वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तर १५ एन. एस. एल. साखर कारखान्याच्या विविध विभागाच्या अधिकाऱ्यांनी सहभाग नोंदविला होता.

बैठकीच्या यशस्वी आयोजनासाठी एफ. पी. ए. आय. मुख्यालयाच्या डायरेक्टर जनरल डॉ. कल्पना आपटे, डिशनल डायरेक्टर जनरल प्रोग्राम अमिता धानू, डायरेक्टर ग्रो प्रोजेक्ट डॉ. निलेश पाटील यांचे मार्गदर्शन लाभले तर शहाबुद्दीन शेख, दिलीप पाटील, किस्किंदा चवरे आणि आकाश गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे स्वागत शहाबुद्दीन शेख यांनी केले, तर प्रास्ताविक सुगतरत्न गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन वीरेंद्र परदेशी यांनी केले आणि आभार प्रदर्शन प्रा. डॉ. एन. बी. तेली यांनी मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# पुरातत्त्व विभागाच्या मार्गदर्शनानुसार दिनांक २२ ते २४ जून दरम्यान श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मूर्तीचे संवर्धन होणार

## सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांची माहिती; दिनांक २३ व २४ जून रोजी मंदिर दर्शनासाठी राहणार बंद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मूर्तीचे दीर्घकालीन जतन आणि संवर्धन करण्याच्या दृष्टीने भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण (डख), राज्य पुरातत्त्व विभाग तसेच मूर्ती संवर्धन क्षेत्रातील तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली आवश्यक कार्यवाही करण्यात येणार आहे. यासंदर्भात नुकत्याच दि.११ जून रोजी एस कार्तिकेयन, जिल्हाधिकारी सोलापूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत विविध तज्ज्ञ, पुरातत्त्व विभागाचे अधिकारी, स्थानिक महाराज मंडळी, मंदिर समितीचे पदाधिकारी, सल्लागार परिषद सदस्य आणि संबंधित अधिकारी यांच्याशी सविस्तर चर्चा करण्यात आली होती. प्राप्त तांत्रिक मार्गदर्शन आणि शिफारशींच्या आधारे दिनांक २२ ते २४ जून या कालावधीत श्री विठ्ठल रुक्मिणी मातेच्या मूर्तींचे संवर्धनाचे काम करण्यात येणार असल्याची माहिती मंदिर समितीचे सह अध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांनी दिली.

या संवर्धनाच्या कामासाठी आवश्यक तांत्रिक प्रक्रिया सुरक्षितपणे पूर्ण करता यावी तसेच मूर्तींच्या पावित्र्याचे आणि सुरक्षेचे रक्षण करता यावे यासाठी दिनांक २३ व २४ जून या दोन दिवसांमध्ये श्री विठ्ठल



रुक्मिणी मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी बंद ठेवण्यात येणार आहे.

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची मूर्ती ही वारकरी संप्रदायाच्या श्रद्धेचे केंद्रस्थान असून, पुरातत्त्व विभाग व तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली अत्यंत काळजीपूर्वक संवर्धनाचे कार्य केले जाणार आहे. यापूर्वी सन १९८८, २००५, २०१२ आणि २०२० या कालावधीत मूर्तीचे संवर्धन करण्यात आले होते. मागील संवर्धनास सुमारे पाच वर्षांचा कालावधी झाल्याने मूर्तीच्या काही भागांमध्ये नैसर्गिक झीज दिसून येत आहे. त्यानुषंगाने मूर्तीतील सूक्ष्म छिद्रे व झिजलेल्या भागांची दुरुस्ती तसेच मूर्तीचे आयुष्यमान वाढविण्यासाठी संरक्षक आवरण (झीींशलींळींश उेरींळपस) देण्यात येणार आहे. सदरची संपूर्ण प्रक्रिया भारतीय पुरातत्त्व सर्वेक्षण, छत्रपती संभाजीनगर व राज्य पुरातत्त्व विभाग पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडणार आहे. याकामी दिनांक २३ व २४ जून रोजी मंदिर दर्शनासाठी बंद राहणार असल्याची वारकरी, भाविक व नागरिकांनी नोंद घ्यावी व प्रशासनास सहकार्य करावे असे आवाहन मंदिर समितीच्या वतीने कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी केले.

---

# पियर एज्युकेटर हा विज्ञानवादी हवा : सुगतरत्न गायकवाड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : ज्याप्रमाणे मातीच्या गोळ्याला कुंभार आकार देतो त्याचप्रमाणे ती वस्तू बनते. त्याप्रमाणेच किशोरावस्थेत सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षणातून सुजन, सुज्ञ व विज्ञानवादी पिढी घडविण्याचा प्रयत्न केला जात आहे. आज आपण पाहतोय अशिक्षित अडाणी लोकांप्रमाणेच शिकलेले लोक ही भोंदू बाबाच्या आहारी गेल्याने आपल्या आयुष्याची राख रांगोळी करून बसत आहेत. कोणत्याच धर्मात किशोरवयीन मुलं, मुली व स्त्रिया सुरक्षित नसल्याचे चित्र आहे. धर्माच्या नावाखाली भोंदूधर्म पंडित किशोरवयीन मुलींवर अतिप्रसंग केल्याचे प्रकरणे उघड होत आहे. ही आपल्या समाजाला लागलेली कीड म्हणावी लागेल. किशोर मुलांना शाळेतूनच योग्य शिक्षण दिले




गेल्यास व पालकांनाही आपल्या पाल्यांची काळजी कशी घेतली पाहिजे याचे मार्गदर्शन मिळाल्यास, अंधश्रद्धेला, अंधभक्तीला बळी न पडता आपल्या पाल्यांना असा विकृत लोकांच्या पासून दूर ठेवल्यास त्यांचे भविष्य वाचू शकेल. किशोरवयीन मुलांमधूनच समवयस्कर पियर एज्युकेटर विज्ञानवादी बनविल्यास ते आपली रक्षा स्वतः करू शकतील असे प्रतिपादन फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे ब्रांच मॅनेजर सुगतरत्न गायकवाड यांनी केले. ते फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेच्या वतीने आयोजित यंग पीपल प्रोग्राम या कार्यशाळेत बोलत होते. यावेळी सोशल वर्कर कल्पना गडगडे, श्रुती कोल्हापूर, परिचारिका स्नेहा जटला, अर्चना पारशेट्टी, व्यंकटेश मच्छा आदींची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेत पुढे बोलताना गायकवाड म्हणाले की, समाज, शाळा व फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया यांच्यातील दुवा म्हणजे पियर एज्युकेटर. किशोरवयीन मुलांनी आपल्या अधिकारांविषयी ज्ञात असावे, सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण शिबिरातून विज्ञानवादी दृष्टिकोन आत्मसात करणारा म्हणजेच पियर एज्युकेटर, घेतलेल्या ज्ञानातून इतर किशोरवयीन मुला-मुलींना अंधश्रद्धेपासून दूर ठेवून विज्ञानवादी बनविणारा म्हणजेच पियर एज्युकेटर. आयोजित केलेल्या या कार्यशाळेत सोलापूर शहरातील ४५ किशोवयीन मुला-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. येत्या शैक्षणिक वर्षात सहभागी किशोरी मुला मुलींच्या शाळेत सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात येणार असल्याचे कल्पना गडगडे यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक श्रुती कोल्हापुरे यांनी केले. सूत्रसंचालन स्नेहा जटला यांनी केले तर आभार दिलीप थोरात यांनी मानले.

---

# पालात राहणाऱ्या भटक्या विमुक्त जाती समाजातील कुटुंबाची गणना देशाच्या घर गणना व जातनिहाय जनगणना प्रक्रियेत स्वतंत्र रखान्यात नोंद करावी या मागणीकरिता मुशाफिरी यात्रेचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



वागदरी/एस.के.गायकवाड : महाराष्ट्रातील मरगरम्मा कोळी, डवरी गोसावी,पारधी,कैकाडी, सह पालात राहणाऱ्या एकून ४२ भटक्या विमुक्त जाती जमातीतील कुटुंबाची गणना देशाच्या घरगणना व जातनिहाय जनगणना प्रक्रियेत स्वतंत्र रखान्यात करण्यात यावी या मागणीसाठी भटक्या विमुक्त समाजात जाणीव जागृती करण्यासाठी मुशाफिरी यात्रेचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती या यात्रेचे प्रमुख मार्गदर्शक तया वंचित बहुजन आघाडीचे नेते जामखेड नगर परिषदेचे नगर सेवक ऍड. डॉ.अरुण (आबा) जाधव यांनी नळदुर्ग ता. तुळजापूर येथे कार्यकर्त्यांशी संवाद साधताना दिली.

सध्या देशाच्या जनगणनेची पूर्वतयारी म्हणून महाराष्ट्रात घरगणना चालू आहे या घरघरणेमध्ये ही महाराष्ट्रात गावोगावी ठीक ठिकाणी पाल मारून राहणाऱ्या भटक्या विमुक्त जाती जमातीतील कुटुंबाच्या पालाची ही गणना घरगणनेमध्ये स्वतंत्र रखान्यात करून सन २०२७ मध्ये होणाऱ्या जनगणनेमध्ये ही या भटक्या मुक्त जाती-जमातीतील कुटुंबाची नोंद जनगणनेच्या प्रक्रियेत स्वतंत्र रखान्यांमध्ये करावी या मागणीसाठी जाणीव जागृती करण्याकरिता दि.०५ ते १४ जून २०२६ पर्यंत महाराष्ट्रातील आहिल्यानगर,पुणे, सोलापूर, धाराशिव,लातूर, बीड व जालना आदी ७ जिल्ह्यात या मुशाफिरी यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.हि यात्रा एकून ११० पाला-वस्त्यांवर पोहचणार असून दि.५जून पासून आहील्यानगर जिल्ह्यातील जामखेड येथून या मुशाफिरी यात्रेला सुरुवात करण्यात आली आहे.

दि.१२ जून २०२६ रोजी ही यात्रा तुळजापूर तालुक्यातील नळदुर्ग या ठिकाणी आली असता वंचित बहुजन आघाडी सह आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी येथील राष्ट्रीय महामार्गावर बसस्थानका समोरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर संविधान चौकात या यात्रेचे उस्पूर्तपणे स्वागत केले याप्रसंगी डॉ.अरुण जाधव हे कार्यकर्त्यांशी संवाद साधत असताना बोलत होते.पुढे बोलताना ते म्हणाले की भटक्या विमुक्तांची घर गणना नाही तर मग जातनिहाय जनगणना कशी होणार आणि जनगणनाच नाही तर मग भटक्या विमुक्त समाजाचा विकास कसा साधला जाणार यासाठी प्रामुख्याने लक्ष वेधण्यासाठी या मुशाफिरी यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे.भारतीय संविधानानुसार देशातल्या प्रत्येक नागरिकाला त्यांचे मानवी हक्क मिळाले पाहिजे.भटक्या विमुक्त समाजातील कुटुंबाचा विकास करण्यासाठी स्वतंत्र विशेष विकास योजना राबविल्या पाहिजेत ही सत्ताधारी सरकारची जबाबदारी आहे याची जाणीव करून देण्यासाठी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राज्याचे प्रमुख मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे या मुसाफिर यात्रेचा अहवाल सादर करण्यात येणार आहे.

### नगरसेवक अँड.अरुण जाधव यांची माहिती

या प्रसंगी आंबेडकरी चळवळीतील जेष्ठ कार्यकर्ते कैलास गवळी गुरुजी,आर.एस. गायकवाड, भिम शक्ती संघटनेचे नेते डॉ.सतीश खारवे,रिपाइं चे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, जिल्हा सचिव एस.के. गायकवाड, वंचित बहुजन आघाडीचे तुळजापूर तालुका अध्यक्ष गोविंद भंडारे,जिल्हा संघटक परमेश्वर लोखंडे, युवा जिल्हा उपाध्यक्ष अशिष लोंढे, मुशाफिरी यात्रेचे समन्वयक प्रा. संतोष चव्हाण, या यात्रेचे प्रतिनिधी तुकाराम शिंदे, ऋषीकेश गायकवाड जाकीर भाई तांबोळी सह परिवर्तनवादी चळवळीतील कार्यकर्ते उपस्थित होत.

---



# हिरेमठ फाऊंडेशनतर्फे 'द सोलापूर क्रिएटर्स अवॉर्ड २०२६' संपन्न; 'विवेक विस्तार' प्रकाशनाचेही दिमाखात उद्घाटन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूरच्या सांस्कृतिक आणि डिजिटल वैभवात भर घालणारा एक अभूतपूर्व सोहळा काल शहरात अत्यंत उत्साहात पार पडला. हिरेमठ फाऊंडेशनच्या वतीने 'द सोलापूर क्रिएटर्स अवॉर्ड २०२६' या विशेष पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यासोबतच फाऊंडेशनच्या 'विवेक विस्तार' या महत्त्वाकांक्षी प्रकाशनाचे औपचारिक उद्घाटनही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सोलापूरमधील उदयोन्मुख डिजिटल प्रतिभावंतांना प्रोत्साहन देणे आणि शहराच्या समृद्ध वारशाचा विस्तार करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश होता.

हा भव्य सोहळा सोलापूरमधील हॉटगी रोड येथील 'द फर्न रेसिडेन्सी, सिरीज बाय मॅरियट' या ठिकाणी संपन्न झाला.

या दिमाखदार सोहळ्याला प्रमुख अतिथी म्हणून राज्यसभा खासदार डॉ. ज्योती वाघमारे उपस्थित होत्या. आपल्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनात डॉ. वाघमारे यांनी डिजिटल माध्यमांची ताकद आणि भविष्यातील संधी यावर विशेष प्रकाश टाकला. सोलापूरला अधिक बलशाली आणि आधुनिक बनवण्यासाठी तंत्रज्ञानाचा योग्य वापर कसा करता येईल, याबद्दल त्यांनी उपस्थितांना बहुमूल्य ज्ञान दिले. कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते आणि हिरेमठ फाऊंडेशनचे अध्यक्ष श्री. विवेकानंद हिरेमठ यांनी सोलापूरच्या समृद्ध संस्कृती आणि ऐतिहासिक वारशाचे पुनरुज्जीवन करण्यावर भर दिला. दिल्लीतील आपले अनुभव सांगताना त्यांनी, आपल्या सर्वांच्या एकत्रित प्रयत्नांतून सोलापूरची सांस्कृतिक श्रीमंती पुन्हा एकदा जागतिक पातळीवर नेऊया, असा ठाम विश्वास व्यक्त केला.

**सोलापूरच्या गुणवंतांचा गौरव आणि विशेष सन्मान**

या सोहळ्यात सोलापूरचे नाव डिजिटल आणि निर्मिती क्षेत्रात उंचावणाऱ्या अग्रगण्य डिजिटल कलाकारांचा सन्मान करण्यात आला. 'द सोलापूर क्रिएटर्स अवॉर्ड' विजेत्यांमध्ये प्रामुख्याने खालील दिग्गजांचा समावेश होता:

सुदक्षणा चाटला, अक्षता आहेरवाडी, नेहा राचर्ला, प्रज्ञा मागी, प्रज्ञा एकनाथ चौधरी, गजराज चौधरी, इम्पॅक्ट मोशन फिल्म्स, राहुल जाधवर, विठ्ठल पुजारी, अभिषेक भांगरे, चंदन पाच्छापुरे, पार्थ भोसले, कृष्णा मालवेकर, ऋषिकेश कोळी, गुरुदत्त जाधव, आकाश कोठडिया, रश्मी मोहोळकर, प्रविज्ञा.

या सर्वांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पकतेसाठी या प्रतिष्ठेच्या पुरस्काराने गौरविण्यात आले. याशिवाय, समाजावर सकारात्मक प्रभाव पाडणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना विशेष 'प्रभाव सन्मान' प्रदान करण्यात आला. यामध्ये गुरुदत्त जाधव, आकाश कोठडिया, रश्मी मोहोळकर आणि प्रविज्ञा यांचा समावेश होता.

या संपूर्ण सोहळ्याचे नेटके नियोजन आणि शोभा वाढवण्यात हिरेमठ फाऊंडेशनचे मंडळ सदस्य श्री. अक्षय एस. जवळगीकर आणि विश्वतेज प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. अक्षय शेटे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. सोलापूरच्या तरुणाईला आणि कलाविश्वाला नवी दिशा देणारा हा सोहळा शहरात दीर्घकाळ लक्षात राहील, यात शंका नाही.

---

**राज्यभरातील ३१ साहित्यिकांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव, ग्रामीण भागातील साहित्य चळवळीचे कौतुक**

# पंढरीत साहित्यिकांचा महाकुंभ! 'परिमल' राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारांचे दिमाखात वितरण

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर/प्रतिनिधी : परिमल सांस्कृतिक व्यासपीठ रोपळे बुद्रुक तालुका पंढरपूर यांच्या वतीने गेल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय साहित्य पुरस्कारांचे मोठ्या थाटात आणि दिमाखदार सोहळ्यात श्रीक्षेत्र पंढरी नगरीमध्ये वितरण करण्यात आले. राज्यभरातील ३१ साहित्यिकांचा विविध श्रेणीतील साहित्य पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी सोलापूर विद्यापीठ, सहाय्यक कुलसचिव तथा मराठी भाषा दक्षता अधिकारी, प्रा. डॉ. शिवाजी शिंदे अध्यक्षस्थानी असलेल्या या सोहळ्याचे उद्घाटक म्हणून मराठी साहित्य परिषदेचे पंढरपूर शाखा अध्यक्ष जेष्ठ पत्रकार सिद्धार्थ ढवळे उपस्थित होते तर युवा नेते प्रणव परिचारक आणि आदर्श माता पुष्पलता निकम, परिमाण संस्कृतीक बास्केट चे अध्यक्ष सचिन कुलकर्णी आदी मान्यवर मंचावर उपस्थित होते.

प्रथम पनवेलचे अध्यक्ष सचिन कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. मान्यवरांचा स्वागतपर सत्कार झाल्यानंतर उद्घाटक सिद्धार्थ ढवळे, प्रमुख पाहुणे प्रणव परिचारक आणि पुष्पलचा निकम यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

मुख्य कार्यक्रमात विविध श्रेणीतील साहित्य पुरस्कार वितरण करण्यात आले. त्यामध्ये

मारुती कटकधोंड, (सोलापूर) यांच्या डोहतळ, रावसाहेब साठे (जत) यांच्या चुकारीची फुलं, बबन धुमाळ (दौंड) यांच्या नवा मोहर गळतो, वासंती वैद्य (पुणे) यांच्या आवर्त, हेमंत रत्नपारखी (मंगळवेढा) यांच्या हा खेळ नव्हे शब्दांचा या पुस्तकांना काव्य परिमल राज्यस्तरीय साहित्य पुरस्कार

राजेंद्र भोसले (सोलापूर) यांच्या परतीचा प्रवास, मधुकर फरांडे (हातकणंगले) यांच्या कोंडी, अनिता जाधव (नांदेड) यांच्या तांड्याचे पाय, डॉ. मारुती नलावडे (ठाणे) यांच्या अहो खरंच ४८० टक्के, डॉ. अनंत कडेठाणकर (छत्रपती संभाजी नगर) यांच्या लाईफ जॅकेट या पुस्तकांना कथा परिमल राज्यस्तरीय पुरस्कार

ना. तु. पोघे (छत्रपती संभाजीनगर) यांच्या इरवाड, सुनील देसाई (भुदरगड) यांच्या सप्तपर्व, सुजितकुमार कांबळे (मंगळवेढा) यांच्या यशबळी, प्रा.शिवाजीराव वाघमारे (पंढरपूर) यांच्या जडणघडण, दिनेश फडतरे (पुणे) यांच्या रँडम या पुस्तकांना साहित्य परिमल राज्यस्तरीय पुरस्कार

ह.भ.प. सूर्याजी भोसले (पंढरपूर) यांच्या कालाभूल, प्रा. नागेश सिंघण (पंढरपूर) यांच्या भाग्यविधाता, संतोष मंजुळे (करमाळा) यांच्या पार्वती, गंधार कुलकर्णी (अमरावती) यांच्या पद्मस्पर्श, संतोष रायबान (मंगळवेढा) यांच्या ओल काळजाची आणि मारुती वाघ (पुसेगाव) यांच्या कर्मचक्र पुस्तकांना उदय परिमल राज्यस्तरीय पुरस्कार

प्रकाश जडे (मंगळवेढा), प्रा.शशिकांत जाधव (मंगळवेढा), डॉ. विजयकुमार देशमुख (मुंबई), प्रा. दादासाहेब खरात (पंढरपूर), वंदना कुलकर्णी (सोलापूर), भारत सातपुते (लातूर), यांना सेवा परिमल पुरस्कार

प्रा .भास्कर बंगाळे (पंढरपूर) प्रा. शिवाजीराव बागल (पंढरपूर), जीवन पाटील (पंढरपूर) आणि प्रा.किसनराव कुराडे पाटील (कोल्हापूर) ज्येष्ठ साहित्यिकांना आयुष्यभरच्या साहित्य सेवेसाठी जीवन गौरव असणारा जीवन परिमल राज्यस्तरीय पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

असे कार्यक्रम लिहिणाऱ्या हातांचे बळ वाढवतात. विशेष म्हणजे ग्रामीण भागात कार्यरत असलेल्या परिमल सांस्कृतिक व्यासपीठ च्या वतीने साहित्यिकांचा गौरव केला जात आहे. ही कौतुकाची बाब आहे. या संस्थेचे अध्यक्ष सचिन कुलकर्णी अतिशय तळमळीने साहित्य सेवा करत आहेत हे पाहून आनंद तर वाटतोच परंतु त्यांमुळे साहित्य चळवळ जिवंत राहते याची खात्री वाटते असे प्रतिपादन सोहळ्याचे अध्यक्ष प्राध्यापक डॉक्टर शिवाजी शिंदे यांनी केले. पुरस्कार प्राप्त साहित्यिकांना त्यांनी शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.

या सोहळ्याचे अतिशय सुंदर सूत्रसंचालन ड. उमाकांत आदमाने यांनी केले तर विश्व विक्रम वीर कवी रवी वसंत सोनार यांनी उपस्थित आमचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी पत्रकार तानाजी जाधव, विकास वळणे, मनीषा कुलकर्णी, प्रीती कुलकर्णी, मुरली शेटे, परिमल सांस्कृतिक व्यासपीठ चे सर्व पदाधिकारी, मित्र परिवाराने परिश्रम घेतले.

# बोरीवली ग्रामपंचायत निवडणूक : प्रभागनिहाय आरक्षण सोडत जाहीर

## १३ सदस्यपदांपैकी ७ जागा महिलांसाठी राखीव; निवडणुकीच्या राजकीय समीकरणांना वेग



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी /मिलिंद जाधव : ठाणे जिल्ह्यातील आगामी ग्रामपंचायत निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शुक्रवारी राज्य निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील ग्रामपंचायतींसाठी सदस्यपदांच्या आरक्षण सोडतीची प्रक्रिया पार पडली. याच अनुषंगाने भिवंडी तालुक्यातील बोरीवली ग्रामपंचायतीच्या निवडणुकीसाठी प्रभागनिहाय आरक्षण सोडत ग्राम पंचायत कार्यालयात विशेष ग्राम सभेद्वारे जाहीर करण्यात आली. या सोडतीमुळे गावातील निवडणुकीची राजकीय गणिते स्पष्ट होण्यास सुरुवात झाली असून इच्छुक उमेदवारांनी तयारीला वेग दिला आहे. यावेळी केंद्रप्रमुख तथा अध्यासी अधिकारी श्यामसुंदर दोंदे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या विशेष ग्रामसभेत चिठ्ठी पद्धतीने आरक्षण सोडत काढण्यात आली. यावेळी पडघा ग्राम महसूल अधिकारी विजय लोहकरे, बोरीवली ग्रामपंचायत अधिकारी गणेश जाधव, सरपंच, विद्यमान सदस्य तसेच ग्राम स्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोडतीनुसार प्रभाग क्रमांक १ मध्ये एकूण ३ जागा असून त्यापैकी १ जागा अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गासाठी तर २ जागा सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. प्रभाग क्रमांक २ मध्ये एकूण २ जागा असून त्यामध्ये १ जागा नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) महिला प्रवर्गासाठी तर १ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव करण्यात आली आहे.

प्रभाग क्रमांक ३ मध्ये एकूण २ जागा असून त्यापैकी १ जागा अनुसूचित जाती (एससी) प्रवर्गासाठी आणि १ जागा सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक ४ मध्ये एकूण ३ जागा असून त्यामध्ये १ जागा नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी), १ जागा सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आणि १ जागा सर्वसाधारण खुल्या प्रवर्गासाठी राखीव ठेवण्यात आली आहे. प्रभाग क्रमांक ५ मध्ये एकूण ३ जागा असून त्यामध्ये १ जागा ओबीसी महिला प्रवर्गासाठी, १ जागा सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी आणि १ जागा सर्वसाधारण प्रवर्गासाठी राखीव करण्यात आली आहे. बोरीवली ग्रामपंचायतीच्या एकूण १३ सदस्यपदांपैकी ७ जागा महिलांसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत. त्यामध्ये ओबीसी महिला प्रवर्गासाठी २ जागा, सर्वसाधारण महिला प्रवर्गासाठी ४ जागा तसेच अनुसूचित प्रवर्गातील महिलांसाठी आरक्षणाचा लाभ लागू होणार आहे. याशिवाय अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गासाठी स्वतंत्र आरक्षण राखण्यात आले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांमधील आरक्षणाची ५० टक्के मर्यादा काटेकोरपणे पाळण्यात आल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली. आरक्षण सोडत जाहीर झाल्यानंतर गावातील विविध राजकीय गटांनी संभाव्य उमेदवारांच्या चाचपणीला सुरुवात केली असून आगामी निवडणुकीत कोण बाजी मारणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. आरक्षण जाहीर झाल्याने अनेक इच्छुकांचे राजकीय समीकरण बदलले असून काही नव्या चेहऱ्यांना संधी मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे बोरीवली ग्रामपंचायत निवडणुकीची रंगत आतापासूनच वाढू लागली आहे.

# आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश; सांगोला तालुक्यातील ५८२ बाधित लाभार्थ्यांना २३.१६ लाखांचे अनुदान मंजूर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सांगोला : गतवर्षी सांगोला तालुक्यात वादळी वाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. तालुक्यातील बहुतांश गावांमध्ये राहत्या घरांवरील पत्रे उडून गेली, घरांच्या भिंती कोसळल्या तसेच अनेक कुटुंबांना उघड्यावर राहण्याची वेळ आली होती. या नैसर्गिक आपत्तीनंतर बाधित नागरिकांना शासनाची मदत मिळावी यासाठी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सुरुवातीपासूनच आक्रमक भूमिका घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर



बावनकुळे व आपत्ती व्यवस्थापन मंत्री ना.गिरिष महाजन यांच्याकडे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला होता. नुकसान झालेल्या घरांची तात्काळ पाहणी आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख आणि तत्कालीन तहसीलदार संतोष कणसे यांनी करत नुकसान झालेल्या घरांचे पंचनामे गावकामगार तलाठी, ग्रामसेवक व कृषी सहाय्यक यांच्या माध्यमातून करून अहवाल तहसील कार्यालयाकडे सादर करण्यात आला. त्यानंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून नुकसानीचे मूल्यांकन करण्यात आले. मात्र मदत मंजुरीला विलंब होत असल्याचे लक्षात येताच आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी या विषयात वैयक्तिक लक्ष घालत तत्कालीन तहसीलदार संतोष कणसे यांच्याशी वेळोवेळी बैठक, पत्रव्यवहार व प्रशासन स्तरावर पाठपुरावा सुरू ठेवला. बाधित नागरिकांना न्याय मिळावा आणि नुकसानभरपाई लवकर मिळावी यासाठी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी महसूल विभाग तसेच शासन स्तरावर सातत्याने प्रयत्न करून विषय मार्गी लावण्याचे काम केले. प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करून पात्र लाभार्थ्यांना मदत मिळवून देण्यावर त्यांनी भर दिला होता.या प्रयत्नांना अखेर यश मिळाले असून शासनाच्या नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून सांगोला तालुक्यातील ७५ गावांतील ५८२ पात्र लाभार्थ्यांना एकूण २३ लाख १६ हजार रुपयांचे अनुदान मंजूर करण्यात आले आहे. वर्षभराच्या प्रतीक्षेनंतर ही मदत संबंधित बाधित खातेदारांच्या बँक खात्यावर लवकरच जमा होणार असल्याची माहिती तहसीलदार बाळुताई भागवत यांनी दिली.

सदरचे अनुदान मंजूर केल्याबद्दल आमदार डॉ.बाबासाहेब देशमुख यांनी मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री मा.एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा पवार तसेच महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व आपत्ती व्यवस्थापन मंत्री ना.गिरिष महाजन यांचे आभार मानले.

# वसंत नाना देशमुख यांना आमचा विरोध आहे, आ. अभिजीत पाटील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष वसंत नाना देशमुख यांनी तीन वेळा भूमिका बदललेली आहे यामुळे असं नाना देशमुख यांची भाजपनिष्ठा तपासावे असे आमदार अमित पाटील यांनी पत्रकारांना बोलताना सांगितले. सोलापूर जिल्हा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे साठी राष्ट्रवादी शरद पवार गटाची सन्नाना देशमुख यांना उमेदवारी दिली आहे. मात्र राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अमित पाटील यांनी वसंत नाना देशमुख यांना सहकार्य न करण्याचा निर्णय घेतला आहे काही दिवसापूर्वी सोलापूर येथे झालेल्या भाजपच्या बैठकीत आमदारा अमित पाटील



उपस्थित राहिले होते त्यामुळे स्थानिक वर्तुळात खळबळ उडाली आहे, आमदार अभिजीत पाटील भाजपमध्ये जाणार असल्याचे चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली होती यानंतर पत्रकाराची आमदार अभिजीत पाटील यांनी विचारले असता ते म्हणाले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार वसंतदादा देशमुख यांनी पंढरपूर नगरपरिषद व जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीमध्ये वेगवेगळी भूमिका घेतली होती त्यामुळे पंचायत समितीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस सभापती होत असताना त्यांनी भाजपला पाठिंबा देऊन त्यांचा सभापती केला त्यामुळे वसंत नाना देशमुख यांची भाजपनिष्ठा असल्याची गरज निर्माण झाली आहे मी राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचा आमदार आहे त्यामुळे कोणत्याही पक्षात प्रवेश करण्याचा विशेष येत नाही असे त्यांनी सांगितले व राष्ट्रवादी काँग्रेसचे सोलापूर जिल्ह्याचे नेते माजी उपमुख्यमंत्री विजयसिंह मोहिते पाटील खासदार दहशिल मोहिते पाटील यांना माझा विरोध नसून पसंदना देशमुख यांना विरोध असल्याचे आमदार अभिजीत पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

# पत्रकारितेच्या माध्यमातून समाजसेवेचा वसा जपणारे मुकुंद कांबळे यांना 'सेवा दीप समाज गौरव पुरस्कार २०२६'




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/केतन भोज : समाजातील सर्वसामान्य, वंचित, दुर्बल आणि गरजू नागरिकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने झटणारे, सामाजिक बांधिलकी जपत पत्रकारितेच्या माध्यमातून जनतेचा आवाज शासनापर्यंत पोहोचविण्याचे कार्य करणारे दैनिक युवक आधारचे सहसंपादक मुकुंद शंकर कांबळे यांना मुंबई येथे आयोजित भव्य समारंभात 'सेवा दीप समाज गौरव पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. हा सन्मान त्यांच्या केवळ पत्रकारितेतील योगदानाचा नसून समाजसेवेप्रती असलेल्या निष्ठेचा आणि जनहितासाठी केलेल्या अथक प्रयत्नांचा गौरव मानला जात आहे.

वृत्तपत्र लेखक, कवी महासंघ, झुंजार लेखणी आणि मैत्री संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पत्रकारिता प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटन सोहळ्यात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी मुकुंद कांबळे यांच्या सामाजिक कार्याचा विशेष उल्लेख करत त्यांचे कौतुक केले.

मुकुंद कांबळे यांनी आपल्या सामाजिक प्रवासाची सुरुवात समाजातील गरजू आणि वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी लढा देत केली. आरोग्य क्षेत्र, शैक्षणिक क्षेत्र आणि विविध सामाजिक उपक्रमांमधून त्यांनी अनेक वर्षे जनतेसाठी काम केले आहे. गरजू रुग्णांना आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे, आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत मिळवून देणे, शासनाच्या योजनांचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवणे तसेच विविध सामाजिक प्रश्नांवर पाठपुरावा करणे, या माध्यमातून त्यांनी समाजसेवेचा वसा जपला आहे.

अलिकडच्या काळात त्यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात प्रवेश करून समाजसेवेची व्याप्ती आणखी वाढवली आहे. त्यांच्यासाठी पत्रकारिता हा केवळ व्यवसाय नसून समाजसेवेचे प्रभावी माध्यम आहे. समाजातील अन्याय, भ्रष्टाचार, दुर्लक्षित प्रश्न आणि सर्वसामान्यांच्या वेदना शासनाच्या दरबारी पोहोचविण्यासाठी त्यांनी लेखणीला समाजसेवेचे शस्त्र बनवले आहे.

पत्रकारितेच्या माध्यमातून समाजातील दुःख, वेदना आणि समस्यांना वाचा फोडून त्या शासन आणि प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे कार्य ते सातत्याने करत आहेत. समाजातील प्रत्येक नागरिकाला न्याय मिळावा, शासनाच्या योजना खऱ्या लाभार्थ्यांपर्यंत पोहोचाव्यात आणि दुर्लक्षित घटकांना हक्काचे जीवन मिळावे यासाठी त्यांची धडपड सुरू आहे.

विशेष म्हणजे, मुकुंद कांबळे यांचे भविष्यातील सामाजिक ध्येयही व्यापक आहे. आर्थिक अडचणींमुळे शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांना मदत मिळवून देणे, बेघर कुटुंबांना शासनाच्या विविध योजनांमधून घरे उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणे, गरीब आणि गरजू नागरिकांना दर्जेदार आरोग्य सेवा मिळवून देण्यासाठी पाठपुरावा करणे तसेच समाजातील दुर्लक्षित घटकांच्या समस्या शासनापर्यंत पोहोचवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी पत्रकारितेच्या माध्यमातून लढा उभारणे, हा त्यांचा संकल्प आहे.

त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत यापूर्वीही त्यांना अनेक प्रतिष्ठेचे पुरस्कार प्राप्त झाले आहेत. साने गुरुजी राष्ट्रपिता पुरस्कार २०२५, महाराष्ट्र प्रतिभा सन्मान पुरस्कार २०२५, सुवर्ण महोत्सवी कृतज्ञता पुरस्कार, मंत्रालयाकडून प्रदान करण्यात आलेले कृतज्ञता पत्र, महाराष्ट्र समाज भूषण गौरव पुरस्कार आणि दर्पण रत्न पुरस्कार २०२५ यांसारख्या सन्मानांनी त्यांचा गौरव करण्यात आला आहे. आता 'सेवा दीप समाज गौरव पुरस्कार २०२६' मिळाल्याने त्यांच्या समाजसेवेच्या कार्याला आणखी एक मानाचा मुकुट लाभला आहे.

पुरस्कार स्वीकारताना भावूक झालेल्या मुकुंद कांबळे यांनी सांगितले की, हा पुरस्कार माझा नसून समाजातील प्रत्येक त्या व्यक्तीचा आहे ज्यांनी माझ्यावर विश्वास ठेवला. पत्रकारिता माझ्यासाठी नोकरी किंवा व्यवसाय नाही, तर समाजसेवेचे एक प्रभावी माध्यम आहे. समाजातील शेवटच्या घटकापर्यंत न्याय पोहोचविण्यासाठी, गरजूंना मदत मिळवून देण्यासाठी आणि लोकांचे प्रश्न शासनापर्यंत पोहोचविण्यासाठी मी भविष्यातही निःस्वार्थपणे कार्य करत राहीन.

त्यांच्या या कार्याबद्दल विविध सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. संघर्ष, समाजसेवा आणि जनतेच्या प्रश्नांसाठीची तळमळ यामुळे मुकुंद कांबळे हे अनेक तरुणांसाठी मदतीसाठी अग्रेसर राहणार आहे.

**स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयाची आणखी एक ऐतिहासिक भरारी!**

# 'ट्रिपल ए' मानांकनामध्ये सर्वोच्च 'ए प्लस प्लस' श्रेणी!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर: पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामार्फत स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेऊन शैक्षणिक व प्रशासकीय लेखापरीक्षणात स्वेरीज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (ऑटोनॉमस) ला ६०० पैकी तब्बल ५८८ गुण (९८%) देत सर्वोच्च 'ए प्लस प्लस' श्रेणी प्रदान केली आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ अंतर्गत विद्यापीठाच्या समितीने महाविद्यालयातील शैक्षणिक गुणवत्ता, अध्यापन-अध्ययन प्रक्रिया, संशोधन व नवोपक्रम, विद्यार्थी विकास, उद्योग-संस्था सहकार्य, प्रशासन, वित्तीय व्यवस्थापन, सामाजिक बांधिलकी तसेच पायाभूत सुविधांचे सखोल मूल्यमापन करून हा मानाचा दर्जा प्रदान केला आहे. या उत्कृष्ट कामगिरीबद्दल विद्यापीठामार्फत महाविद्यालयास 'ट्रिपल ए' चे प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले असून ही मान्यता नोव्हेंबर २०२८ पर्यंत वैध राहणार आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, संशोधनाभिमुख वातावरण, उद्योगाभिमुख उपक्रम, अत्याधुनिक सुविधा आणि प्रभावी प्रशासन यांच्या बळावर स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयाने पुन्हा एकदा आपल्या उत्कृष्टतेची विद्यापीठ स्तरावर ठळक नोंद करून दिली आहे.



या लेखापरीक्षणामध्ये अभ्यासक्रम नियोजन व प्रभावी अंमलबजावणी, शैक्षणिक दिनदर्शिकेचे काटेकोर पालन, माहिती तंत्रज्ञान आधारित अध्यापन, आऊटकम बेस्ड एज्युकेशन, विद्यार्थी-केंद्रित अध्यापन पद्धती, एनपीटीइएल/ स्वयम मध्ये विद्यार्थ्यांचा उल्लेखनीय सहभाग, इंटर्नशिप, उद्योगाभिमुख प्रकल्प, विद्यार्थी समाधान सर्वेक्षण, पालक व उद्योगक्षेत्राचा अभिप्राय, विद्यार्थी-मार्गदर्शन प्रणाली, उत्कृष्ट निकाल या बाबींचे मूल्यमापन करण्यात आले. महाविद्यालयाने या सर्व निकषांमध्ये उत्कृष्ट कामगिरी नोंदवली आहे.

संशोधन व नवोपक्रम क्षेत्रात एससीआय व स्कोपस संशोधन प्रकाशने, संशोधन प्रकल्पांसाठी प्राप्त निधी, पीएच.डी. मार्गदर्शक असणारे प्राध्यापक, पेटंट्स, अविष्कार स्पर्धेतील यश, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिषदांमधील सहभाग, उद्योग व शैक्षणिक संस्थांसोबतचे सामंजस्य करार, संशोधन सहकार्य आणि विस्तार उपक्रम या सर्व बाबींचे मूल्यांकन करण्यात आले.

विद्यार्थी विकासाच्या दृष्टीने उत्कृष्ट प्लेसमेंट, करिअर मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास कार्यक्रम, अभ्यास दौरे, तज्ज्ञ व्याख्याने, एन.एस.एस. उपक्रम, तांत्रिक स्पर्धांमधील सहभाग व पारितोषिके, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील यश, उद्योजकता विकास आणि माजी विद्यार्थ्यांचे योगदान या सर्व बाबी संस्थेच्या सर्वांगीण विकासाच्या प्रतीक ठरल्या.

उत्तम प्रशासन, व्यवस्थापन व पायाभूत सुविधांमध्ये एआयसीटीई मानकांनुसार पात्र व पीएच.डी. धारक प्राध्यापक वर्ग, डिजिटल प्रशासन, नॅक आणि एनबीए गुणवत्ता उपक्रम, अत्याधुनिक प्रयोगशाळा, स्मार्ट वर्गखोल्या, ई-लर्निंग सुविधा, समृद्ध ग्रंथालय, संशोधन प्रयोगशाळा, उच्च गतीयुक्त इंटरनेट, स्वतंत्र वसतिगृहे, क्रीडा सुविधा, दिव्यांग अनुकूल परिसर, सुरक्षा व्यवस्था आणि विद्यार्थी-केंद्रित सुविधा उपलब्ध असल्याची समितीने नोंद घेतली.

**स्वेरीच्या स्थापनेपासून आजपर्यंत 'ट्रिपलपीई' अर्थात 'पंढरपूर पॅटर्न इन प्रोफेशनल एज्युकेशन' च्या माध्यमातून व संस्थापक डॉ. बी.पी.रोंगे (सर) यांच्या मार्गदर्शनाखाली गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे अनेक नावीन्यपूर्ण प्रयोग करण्यात आलेले आहेत. अशा नाविन्यपूर्ण उपक्रमांचा एकत्रित परिणाम म्हणजे स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयास मिळालेली ही सर्वोच्च 'ए प्लस प्लस' श्रेणी होय.**

स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयाला प्राप्त झालेली 'ए प्लस प्लस' श्रेणी ही केवळ गुणवत्तेची मान्यता नसून, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे तंत्रशिक्षण देण्याच्या संस्थेच्या वचनबद्धतेचा गौरव आहे. संस्थेचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, गुणवत्तापूर्ण शिक्षणाविषयीची दृढ बांधिलकी आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शनामुळे हे अभूतपूर्व यश संपादन झाले आहे. संस्थेचे सचिव डॉ. सूरज रोंगे यांचे गतिमान नेतृत्व, कॅम्पस इन्चार्ज डॉ. मुकुंद पवार यांचे समन्वयात्मक नेतृत्व, उपप्राचार्या डॉ. सौ. मिनाक्षी पवार यांचे प्रभावी शैक्षणिक मार्गदर्शन, तसेच आयक्यूएसी समन्वयक व 'ट्रिपल ए' चे प्रमुख समन्वयक डॉ. संदीप वांगीकर यांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांमुळे हे यश शक्य झाले आहे. यासोबतच सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी, पालक, माजी विद्यार्थी तसेच उद्योग क्षेत्रातील सहकाऱ्यांच्या सामूहिक प्रयत्न, समर्पण आणि उत्कृष्टतेच्या ध्यासामुळे स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयाने हे यश संपादन केलेले आहे. गुणवत्ता, संशोधन, नवोपक्रम, उद्योगाभिमुख शिक्षण, परिणामाधिष्ठित अध्यापन, प्रभावी प्रशासन आणि अत्याधुनिक पायाभूत सुविधांचा उत्कृष्ट समन्वय साधत संस्थेने गुणवत्तेचा हा नवा आदर्श निर्माण केला आहे. हे यश संपूर्ण स्वेरी परिवारासाठी अभिमानाचा आणि गौरवाचा क्षण आहे. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक व प्राचार्य डॉ. बी.पी.रोंगे, संस्थेचे अध्यक्ष अशोक भोसले, उपाध्यक्ष सुरेश राऊत, सचिव डॉ. सुरज रोंगे, संस्थेचे इतर पदाधिकारी व विश्वस्त, सर्व संचालक मंडळ, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी.मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. एस. व्ही. मांडवे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, इतर अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व पालकांनी सर्वांचे अभिनंदन केले.